स्वांतत्र्याचा अमृत महोत्सव

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.
(A Government of Maharashtra Undertaking)
(CIN: U40109MH2005SGC153645)

DR. MURHARI KELE
Director (Commercial)

जा.क./ मु.अ./न.ऊ./मुसौकृवायो/ २९४३५ दि. १६.११.२०२२

## नवीकरणीय ऊर्जा परिपत्रक क्र.७

**विषय :-** मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत कृषी वाहिनीचे सौर ऊर्जीकरण करण्याच्या दृष्टीने लागणाऱ्या जमीनीचा भाडेपट्टा निश्चित करण्याचे सुधारित धोरण व आवश्यक जमीनी सुलभरित्या व शिघ्रगतीने उपलब्ध करण्याबाबत आवश्यक सहाय्य देण्याबाबत.

**संदर्भ :-** १. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे पत्र दि.१९.०७.२०२२ रोजीचे
२. शासन पत्र क्र.सौरप्र-२०२२ प्र.क्र.१५५ भाग-१/ऊर्जा-७ दि.११.१०.२०२२
३. मु.अ./न.ऊ./२७२७० दि.१८.१०.२०२२
४. शासन निर्णय क्र.सौरप्र-२०२२/प्र.क्र.१५५/ऊर्जा-७ दि.०२.११.२०२२.

मा. उपमुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.१३.०७.२०२२ रोजी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेविषयी आढावा बैठक घेण्यात आली होती. या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार महावितरणद्वारे प्रत्येक जिल्ह्यातील ३०% कृषी वाहिनी या वर्षाअखेर पर्यंत सौर ऊर्जेवर आणण्याचे सुचित करण्यात आले होते. तसेच कृषी वाहिनी सौर ऊर्जिकरण करण्याकरीता लागणारी जागा महसूल विभागाद्वारे उपलब्ध करुन देण्याबाबत चर्चा झाली होती.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत प्रकल्पांसाठी शासकीय/ग्रामपंचायत शासकीय जमीनी उपलब्ध करुन देण्याबाबतची विनंती पत्र या कार्यालयाने सर्व संबंधित जिल्हाधिकारी यांना संदर्भ क्र. १ नुसार देण्यात आले असून सौर ऊर्जा प्रकल्पासाठी लागणारी जमिनीच्या उद्दिष्टांची व उपकेंद्रांची जिल्हानिहाय, तालुकानिहाय यादी सोबत देण्यात आली आहे.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीच्या दि.२८.०९.२०२२ रोजी झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत कृषी फिडरचे सौर उर्जिकरण करण्याच्या दृष्टीने जागेचे नियोजन व समन्वय करण्याचे निर्देश सांघिक कार्यालयाला शासनाकडून संदर्भ क्र.२ नुसार प्राप्त झाले आहेत.

सदर योजना अधिक गतीमान करण्यासाठी जास्तीत जास्त शासकीय/ ग्रामपंचायत जागा महावितरणला उपलब्ध करुन देण्याचे निर्देश महसूल विभागाला देण्यात आले होते व तसेच जमिनीची उपलब्धता युद्धपातळीवर करण्याकरीता महावितरणचे अधीक्षक अभियंता, उप अभियंता व कार्यकारी अभियंता (स्थापत्य) व महसूल खात्यातील उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांच्यासोबत संपर्क व समन्वय साधण्याबाबत या कार्यालयाद्वारे संदर्भ क्र.३ नुसार सुचना देण्यात आल्या आहेत.

उपरोक्त समिती महावितरणने सादर केलेल्या प्रस्तावावर चर्चा करुन सौर कृषी वाहिनी तसेच अन्य सौर ऊर्जा प्रकल्पांसाठी खाजगी जमीन, शासकीय जागा, महामंडळे/ कृषी विद्यापीठ/ शासकीय विभाग यांच्याकडील उपलब्ध असलेल्या विनावापर/ पडीक जमीन महावितरणला उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने आवश्यक सहाय्य करेल.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी व त्यासाठी लागणारी सुलभतेने उपलब्ध होण्यासाठी खालील निर्णयाला शासन मान्यता देण्यात आली आहे.

**१. जमिनीचा भाडेपट्टा दर :**

अ) मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत कृषी वाहिनीचे सौर ऊर्जीकरण करण्याच्या दृष्टीने लागणारी खाजगी जमीन महावितरण कंपनीला भाडेपट्ट्याने उपलब्ध करुन देताना जागेची त्या वर्षीच्या नोंदणी व मुद्रांक विभागाने निर्धारित केलेल्या किंमतीच्या ६% दरानुसार परिगणत केलेला दर किंवा प्रति वर्ष रु.७५,०००/- प्रति हेक्टर यापैकी जी रक्कम जास्त असेल त्यादराने वार्षिक भाडेपट्टयाच्या दर निश्चित करण्यात यावा. सदरचे काम कार्यकारी अभियंता (स्था.) यांनी बघावे, तसेच निश्चित केलेला भाडेपट्टी दर लँड बँक पोर्टलमध्ये दर्शविण्यात यावा.

ब) प्रथमवर्षी आलेल्या पायाभूत वार्षिक भाडेपट्टी दरावर (Base rate) प्रत्येकी वर्षी ३ टक्के सरळ पध्दतीने भाडेपट्टी दरात वाढ करण्यात येईल.

क) महावितरणने निश्चित केलेल्या जमिनींना निविदा प्रक्रियेमध्ये समाविष्ट करण्यात येईल. सदर जमिनीची निवड सौर ऊर्जा प्रकल्प धारक करतील. जमीन भाडेपट्टीचा करार हा जमिन धारक व महावितरण यांच्याद्वारे प्रकाशित निविदांमध्ये यशस्वी झालेल्या सौर ऊर्जा प्रकल्प धारकामध्ये होईल. सदर जमिनीवर सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित होईपर्यंत उपरोक्त प्रमाणे निश्चित झालेला भाडेपट्टीच्या दरानुसार झालेल्या जमिनीची भाडेपट्टी करारानुसार भाडेपट्टीच्यी रक्कम जमीनधारकास (व्यक्ती/संस्था) सौर ऊर्जा प्रकल्प धारकाद्वारे अदा करण्यात तसेच प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर जमीनधारकास (व्यक्ती/संस्था) भाडेपट्टी महावितरणद्वारे जमीन धारकाच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल. प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर सदर जमिनीवर सौर ऊर्जानिर्मितीचे देयक भाडेपट्टीपेक्षा कमी असल्यास भाडेपट्टीची रक्कम जमीन धारकास (व्यक्ती/संस्था) अदा करण्याची जबाबदारी सौर ऊर्जा प्रकल्प धारक याची राहील.

**२. महावितरणच्या कृषीवाहिन्यांचे सौर ऊर्जीकरण करण्यासाठी उद्दिष्ट:**

प्रत्येक जिल्ह्यातील महावितरण कडील एकूण कृषी वाहिन्यांपैकी किमान ३०% कृषी वाहिन्यांचे सौर ऊर्जीकरण महावितरणने जलद गतीने करावे.

**३. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनीसाठी जमीन उपलब्धतेत सहाय्य करण्यासाठी समिती:**

३.१ मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत कृषी वाहिन्यांचे सौर ऊर्जीकरण करण्याच्या दृष्टीने प्रत्येक जिल्ह्यातील ३०% कृषी वाहिन्या ह्या सौर ऊर्जेवर आणण्याबाबतचे निश्चित करण्यात आलेले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी आवश्यक असणारी जमीन तातडीने उपलब्ध व्हावी याकरिता सहाय्य करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली आहे.

| | |
|---|---|
| १) जिल्हाधिकारी | - अध्यक्ष |
| २) अधीक्षक अभियंता, (संवसु) महावितरण कंपनी | - सदस्य सचिव |
| ३) सहाय्यक संचालक, नगर रचना | - सदस्य |
| ४) महाऊर्जाचा प्रतिनिधी | - सदस्य |

३.२ प्रत्येक जिल्ह्यातील महावितरण कंपनीच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी उपकेंद्राचे स्थळ निश्चित करावे. सदर उपकेंद्राचे स्थ्ळ व उपकेंद्रापासून किती परिघामध्ये जमिन आवश्यक आहे, याचा तपशिल महावितरणचे अधिकारी त्या त्या जिल्ह्याच्या उपरोक्त समितीस सादर करतील. उपकेंद्राच्या परीघातील जमीन निश्चित करण्यासाठी आवश्यकतेनुसार GIS नकाशांचा सुद्धा वापर करण्सात यावा.

३.३ उपरोक्त समिती महावितरण कंपनीने सादर केलेल्या प्रस्तावाची छाननी करुन सौर कृषी वाहिनी योजना तसेच अन्य सौर ऊर्जा प्रकल्पांसाठी खाजगी, शासकीय जमीन, महामंडळे/ कृषी विद्यापीठ/ शासकीय विभाग यांच्याकडील उपलब्ध असलेल्या विनावापर/ पडीक जमीन महावितरण/ महानिर्मिती/ महाऊर्जा कंपनीला भाडेपट्ट्यावर उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने आवश्यक ते सर्व सहाय्य करेल.

**४. अकृषिक सनद :**

सौर ऊर्जा प्रकल्पासाठी जी जमीन निश्चित होईल त्या ठिकाणी महावितरण/ महानिर्मिती कंपनीद्वारे/ महाऊर्जा संस्थेद्वारे आस्थापित करण्यात येणाऱ्या सौर ऊर्जा प्रकल्पास महावितरण/ महानिर्मिती / महाऊर्जा यांचेसोबत वीज खरेदी करार करण्यास (PPA) मान्यता मिळाल्यानंतर त्या जमिनीवर प्रकल्प उभारण्यास महावितरण/ महानिर्मिती / महाऊर्जा यांचेकडून परवानगी देण्यात येईल व तद्नंतर त्या जमीनीच्या अकृषिक वापराच्या परवानगीची सनद महसूल यंत्रणा तातडीने जारी करेल.

वरील निर्णय मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना, कुसुम घटक अ व क या योजनांना लागू राहतील. तसेच वरील निर्णयानुसार लागू केलेला भाडेपट्टी दर हा दि.०२.११.२०२२ रोजी नंतर अर्ज केलेल्या जागांसाठी लागू राहील.

सदर परिपत्रक महावितरणच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावरील Renewable Energy मध्ये उपलब्ध असुन त्याची मुद्रांकित प्रत प्रसारीत करण्यात येणार नाही. तसेच सदर परिपत्रकास व्यापक प्रसिद्धी देण्यात यावी.

डॉ. (प्र. स्तो.) ...

**संचालक (वाणिज्य)**
**महावितरण**

**प्रत सविनय सादर-**

१. मा.संचालक (वित्त/ संचलन/ प्रकल्प)
२. सह व्यवस्थापकिय संचालक, प्रादेशिक विभाग-कोंकण, औरंगाबाद
३. प्रादेशिक संचालक- पुणे, नागपूर
४. अध्यक्ष व व्यवस्थापकिय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी
५. सर्व मुख्य अभियंता, सं व सु परिमंडळ
६. मुख्य अभियंता (स्थापत्य), सांघिक कार्यालय, मुंबई
७. सर्व विभाग प्रमुख, सांघिक कार्यालय, मुंबई.

**प्रत सादर-**

१. सर्व अधीक्षक अभियंता, सं व सु मंडळ
२. सर्व कार्यकारी अभियंता (स्थापत्य)